**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १३९५८/२०२५ नि.क्र. ११**

महाराष्ट्र सरकार वि. भाऊसाहेब कोतकर

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा शपथेवर जबाब –**

माझे नाव – सुनील दिलीप निमसे

माझे वय – ३८ वर्षे

व्यवसाय – जवान, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, अहमदनगर

राहाणार – केडगाव, अहमदनगर

सरतपास विधीज्ञ श्रीमती.आर. एच. शेळके यांचे मार्फत शपथेवर सुरु –

१. दिनांक ११.१०.२०२५ रोजी मी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, अहमदनगर येथे कार्यरत होतो. त्यादिवशी एस.आर.कुसळे, निरीक्षक यांना खबर मिळाली होती की, केडगाव नेप्ती रोडवर एक इसम गावठी हातभट्टी दारूची वाहतुक करित आहे. त्यानुसार कार्यालयातुन निघुन आम्ही पंच व कर्मचारी सरकारी वाहन क्र.एमएच १६ बी वाय ६२५२ ने एकनाथ नगर, केडगाव येथे गेलो. त्याठिकाणी गेल्यानंतर आम्ही आलीकडे थांबलो. समोरून दुचाकी वाहनावर संशयीत इसम येत होता. त्यास साहेबांनी आडवले. त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव भाऊसाहेब देवीदास कोतकर असे सांगितले.

२. त्यावेळी त्याच्या ताब्यात २ रबरी टयुबमध्ये गावठी दारू आढळुन आली. त्याची अंदाजे किंमत रूपये१२,०००/– होती. साहेबांनी मुद्देमाल व वाहन ताब्यात घेतले आणि त्यापैकी गावठी दारूचा नमुना घेवुन रासायनिक तपासणीकरिता वेगळा काढला. त्यावर गुन्हयाबाबत माहिती असलेले कागदी लेबल चिटकवले आणि लाखसिल बंद केले. त्यावर पंचांची व आरोपीची सही घेतली. त्यानंतर साहेबांनी पंचांसमक्ष दिसत्या परिस्थितीचा पंचनामा तयार केला. त्यानंतर मी कार्यालयात येवुन आरोपीविरूध्द फिर्याद दिली. अभिलेखावर दाखल फिर्यादवर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.१२** देण्यात आली. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री ए.एच.पालवे यांचेमार्फत सुरू –</u>**

३. दिनांक ११.१०.२०२५ रोजी साहेबांना मिळालेल्या बातमीची नोंद केलेली नाही. आम्ही घटनास्थळावर ज्या सरकारी वाहनाने गेलो होतो त्याची लॉगबुकला नोंद केली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे गर्दीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच रोडवर आरोपी राहयला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.१०.२०२५ रोजी मी साहेबांसोबत जावुन कोणताही छापा टाकला नाही आणि आरोपीकडुन कोणतीही दारू जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, साहेबांनी पंचांना कार्यालयात बोलावुन तेथेच पंचनामा तयार केला आणि पंचांच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देतांना पंचांची नावे सांगितलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पंच आमच्या सोबत नव्हते म्हणुन फिर्याद देतांना त्यांची नावे सांगितलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केसेसची कामगिरी दाखविण्याकरिता मी आरोपीविरूध्द फिर्याद दिली आणि खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/-

(माधुरी रा. खनवे)

दिनांक ०१/०४/२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०४, अहमदनगर